Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# नवीन आर्थिक धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणामाचा अभ्यास

**चैतन्य विनायक राठोड**
संशोधक विद्यार्थी
chaitnyarathod123@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आर्थिक प्रगतीच्या देशांतर्गत मर्यादा लक्षात आल्या आणि त्या दूर करण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडले जाण्याची निकड अनिवार्य ठरली, की मग आर्थिक सुधारणांना पर्याय उरत नाही. अशावेळी अर्थव्यवस्था जाचक आणि निरुपयोगी नियंत्रणांपासून मुक्त करावी लागते. आर्थिक प्रगतीच ध्येय गाठण्यासाठी अधिकाधिक उदारमतवादी अशा प्रक्रिया राबवणे आवश्यक असते.

भारतीय आर्थिक सुधारणांमध्ये १९९१ हे वर्ष महत्त्वाचे ठरते. २१ जून १९९१ ला काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकांत अंतर्गत आणि बहिर्गत आत्मविश्वास उंचविण्यासाठी अनेक स्थिरीकरणात्मक उपाय योजण्यास सुरुवात केली. सरकारने परकीय गुंतवणूक व्यापार, विनिमाय दर, उद्योग, बेंका, वित्तीय संस्था आणि राजकोषीय धोरण यासंबंधी धोरणामध्ये मूलभूत बदल केले. या सर्व एकत्रित घटकांना आर्थिक धोरण असे म्हटले जाते. नवीन आर्थिक सुधारणांच्या नावाखाली १९९१ पासून भारत सरकारने अनेक नवीन धोरणांची घोषणा केली. नवीन आर्थिक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला एक वेगळी नवीन दिशा आणि परिमाण मिळाले.

**उद्देश:**

१. आर्थिक सुधारणांची गरज का भासली? हे जाणून घेणे.
२. भारतीय अर्थव्यवस्थेची सुधारणा कशा पद्धतीने होत आली? याबद्दल जाणून घेणे.
३. आर्थिक सुधारणांचे चांगले आणि वाईट परिणाम यांबद्दल जाणून घेणे.
४. भविष्यात आवश्यक असणाऱ्या आर्थिक सुधारणांबद्दल जाणून घेणे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

**माहिती संकलनः**

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे, त्यासाठी विविध मासिके, शासकीय संकेतस्थळे, पुस्तके तसेच वर्तमान पत्रातील लेख यांच्या सहाय्याने माहिती संकलन केले आहे.

**विश्लेषणः**

आर्थिक सुधारणांमध्ये १९९१ मध्ये अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि त्याच्या आर्थिक वाढीच्या दरात वाढ करण्याच्या योजनेसह सुरू झालेल्या मूलभूत बदलांचा संदर्भ आहे. १९९१ मध्ये सुधारणांची प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी सरकारने भारतीय अर्थव्यवस्था जगातील इतर देशांपासून दूरच ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील मक्तेदारांमुळे पायाभूत सोयी सुविधांमधील गुंतवणूक फारच कमी होती. असे असले तरी या क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी अधिक वाव होता. आतापर्यंत अंमलात आणल्या गेलेल्या धोरणामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्याची गरज वाटू लागली. १९९१ साली त्याची सुरुवात झाली.

भारतात १९९१ नंतर आर्थिक सुधारणांची गरज ही प्रामुख्याने व्यवहार तोलातील धोक्याची स्थिती अति नियंत्रण, संरक्षणाचे धोरण, अतिरिक्त नियंत्रणे, उच्च कर दर व जकाती आणि परवाना राजपद्धती यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक सुधारणांची गरज झालेली होती.

भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर हा खूपच कमी होता. औद्योगिक विकास थोड्याफार प्रमाणात वाढत्त असला तरी त्या प्रमाणात देशात रोजगाराच्या संधी वाढत नव्हत्या. सार्वजनिक क्षेत्र आणि एकंदर देशाची अर्थव्यवस्था कमी उत्पादकतेचा सामना करीत होती. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समस्यांचे प्रमाण बाडत होते. भारतीय अर्थव्यवस्थेवर चलनवाडीचा दबाव होता, त्यामुळे विषमता वाढत होती. या काळात परकीय चलनाची टंचाई निर्माण झालेली होती. जगातील औद्योगिक दृष्ट्या प्रगत अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करण्यासाठी आर्थिक सुधारणांची गरज निर्माण झाली. सरकार परवाना पद्धतीद्वारे औद्योगिक विकास नियंत्रित करत होते, ज्यामुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढत होता परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढावा, ज्यामुळे तांत्रिक मागासले पणावर मात करता येईल व आर्थिक विकासास चालना देता वेईल. म्हणून भारतासारख्या विकसनशील देशामध्ये अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये नवीन आर्थिक सुधारणा राबविणे ही काळाची गरज झाली.

१९८५ मध्ये पंतप्रधान म्हणून कार्यभार हाती घेतल्यानंतर राजीव गांधी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणामध्ये बदल करण्याचे सूचित केले. नवीन आर्थिक धोरणाचा मूलभूत विश्वास हा

खाजगी क्षेत्राच्या सहभागावर होता. खाजगी क्षेत्राची व्याप्ती वाढावी यासाठी औद्योगिक परवाना, परकीय व्यापार, परकीय समभाग, भांडवल, तांत्रिक सुधारणा, नियंत्रण कमी करणे यासंबंधी धोरणामध्ये बदल केले गेले. हे सर्व बदल खाजगी क्षेत्राला योग्य वातावरण निर्माण व्हावे आणि त्यामुळे देशाच्या जलद आर्थिक विकासाला चालना मिळावी या हेतूने केले गेले. परंतु, या सुधारणांचा अनुकूल असा परिणाम देशामध्ये दिसून आलेला नव्हता.

२१ जून १९९१ ला पी. व्ही. नरसिंह राव यांनी देशाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात केली. देशामध्ये अंतर्गत आणि बहिर्गत आत्मविश्वास स्थापन होण्यासाठी स्थिरिकरणात्मक उपाय आणि रचनात्मक समायोजन यांची अंमलबजावणी सुरु केली. १९९१ चे संकट मुख्यत्वे १९८० च्या दशकात भारताच्या अर्थव्यवस्थेच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे झाले. सरकार वाढवित असलेला वाढता खर्च कमाई च्या तुलनेत पुरेसे नव्हते. अशा प्रकारे कर्ज फेडण्यासाठी सरकारला कर्ज घ्यावे लागले आणि त्यामुळे कर्ज-सापळे नावाच्या शब्दात अडकले. कर्ज-जाळे ही तूट आहे जी सरकारच्या महसूलाच्या तुलनेत सरकारी खर्चात वाढ झाल्याने उद्भवते.

२४ जुलै १९९१ मध्ये एलपीजी किंवा उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण हे भारताचे नवीन आर्थिक धोरण म्हणून घोषित करण्यात आले. उदारीकरणामुळे असे घडले होते की, विकासाचा आणि विकासाचा अडथळा ठरलेल्या कोणत्याही निर्बंधांचा अंत होईल. मुख्य म्हणजे या सुधारणांमुळे सरकारी नियम आणि धोरणे गमावली. परदेशी गुंतवणुकीसाठी तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी आर्थिक सीमा उघडण्यास परवानगी दिली. यांमध्ये उत्पादन क्षमता वाढविणे, शासनाचे औद्योगिक परवाना रद्द करणे, उत्पादनक्षम क्षेत्र न रोखणे आणि वस्तू आयात करण्याचे स्वातंत्र्य यांचा समावेश होता.

खाजगीकरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील कामाचा ताण कमी करणे, शेवटच्या वापरकर्त्यांना उत्तम वस्तू व सेवा पुरविणे, सरकारची आर्थिक स्थिती सुधारणे होय. खाजगीकरण हा थेट परकीय गुंतवणुकीला अनुमती देण्याचा आणि अर्थव्यवस्थेत निरोगी स्पर्धा आणण्याचा एक मार्ग आहे. जागतिकीकरण म्हणजे जगाशी जोडले जाणे होय. जागतिकीकरण हे खाजगी आणि परदेशी गुंतवणुकीला आणि परदेशी व्यापारास प्रोत्साहित करते. आर्थिक सुधारणांच्या काळात सेवेची वाढ होती. भारतीय अर्थव्यवस्था उघडल्यामुळे एफडीआय आणि परकीय चलन राखीव क्षेत्रात मोठी वाढ झाली. सुधारणांच्या काळापासून इंजीनिअरिंग वस्तू, ऑटो पार्ट्स, आयटी सॉफ्टवेअर, कापड या निर्यातदारांपैकी भारत एक आहे. सुधारणांच्या काळात महागाई देखील नियंत्रणात ठेवली गेली.

आर्थिक सुधारणांच्या काळात कृषी क्षेत्राकडे प्रामुख्याने दुर्लक्ष झाले. या क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक कमी झाली आणि त्यामुळे पायाभूत सुविधांवर परिणाम झाला खतांवरील अनुदान काढून टाकले गेले आणि त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली, ज्याचा परिणाम हा अल्पभूधारक आणि लहान शेतकऱ्यांना झाला. आयात स्वस्त केली गेली. ज्यामुळे औद्योगिक वस्तूंची मागणी कमी झाली.

**सध्याच्या काळात आवश्यक अशा आर्थिक सुधारणाः**

विशेष आर्थिक क्षेत्रांचे (SEZ-Special economic zone) उत्तम व्यवस्थापन करण्यात यावे. सुशासनाला चालना देण्यात यावी आणि कायद्याचे मजबूत शासन स्थापित करण्यात यावे. कार्यक्षम पुरवठा साखळी स्थापन करण्यात यावी.

**निष्कर्ष:**

१. १९९१ साली आर्थिक सुधारणांची खल्या अचनि मुहूर्तमेढ रोवली गेली.
२. आर्थिक सुधारणांच्या आधीची परिस्थिती कशी होती हे जाणले.
३. आर्थिक सुधारणांची गरज निर्माण होत गेली.
४. आर्थिक सुधारणांचा पहिला टप्पा हा १९८५ मध्ये सुरु झाला.
५. १९९१ मध्ये आर्थिक सुधारणांचा दुसरा टप्पा सुरू झाला.
६. एल.पी.जी. धोरण हे नवीन आर्थिक धोरण म्हणून स्वीकारण्यात आले.
७. जागतिक स्तरावर भारतीय वस्तूंच्या निर्यातीस प्रारंभ झाला
८. कृषी क्षेत्रावर आर्थिक सुधारणांच्या काळात मात्र विपरीत परिणाम झाला.
९. सध्याच्या काळात आवश्यक अशा आर्थिक सुधारणा.

**संदर्भ:**

१. https://Maharashtratimes.com २१/३/२०२२
२. B.A.part-I economics sem-१ unit-३
३. www.orfonline.org २१/३/२०२२